# AEML Transmission MYT Petition

# Executive Summary - Marathi

# Case No. 297 of 2019

## अनुक्रमणिका

**१. परिचय........................................................................................................३**

१.१ बहु-वर्षीय दर (एमवायटी) अधिनियम........................................................................................................३

१.२ बहु-वर्षीय दर (एमवायटी) याचिका सादर करण्यासाठी पार्श्वभूमी........................................................................................................३

१.३ परवाना-अदाणी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेड........................................................................................................४

**२. आर्थिक वर्ष १७-१८ आणि आर्थिक वर्ष १८-१९ साठी आकडेवारी साजेशी (ट्रुईंग अप) करणे:................५**

२.१ भांडवली खर्च आणि भांडवलीकरण........................................................................................................५

२.२ आर्थिक वर्ष १७-१८ आणि आर्थिक वर्ष १८-१९ साठी एआरआर निश्चित करण्यासाठी निकष..............................................५

२.३ आर्थिक वर्ष १८-१९ मधील अधिक परिणाम........................................................................................................६

२.४ आर्थिक वर्ष १७-१८ आणि आर्थिक वर्ष १८-१९ साठी महसूलातील फरक/शिल्लक निधी................................................६

**३. आर्थिक वर्ष १९-२० साठी आकडेवारी तात्पुरती साजेशी करून घेणे............................................१०**

३.१ भांडवली गुंतवणूक योजना आणि भांडवलीकरण........................................................................................................१०

३.२ आर्थिक वर्ष १९-२० साठी एआरआर निश्चित करण्याचे निकष........................................................................................................१०

३.३ आर्थिक वर्ष १९-२० साठी अस्थायी महसुली फरक/शिल्लक निधी........................................................................................................११

**४. आर्थिक वर्ष २०-२१ ते आर्थिक वर्ष २४-२५ साठी एआरआर....................................................१२**

४.१ भांडवली गुंतवणूक योजना आणि भांडवलीकरण........................................................................................................१२

४.२ नियंत्रण कालावधीसाठी एआरआर निश्चित करण्याचे निकष........................................................................................................१२

४.३ महसूलातील फरक/शिल्लक निधी आर्थिक वर्ष १७-१८ आणि आर्थिक........................................................................................................१३

वर्ष १८-१९ ते आर्थिक वर्ष २०-२१ साठी वहन खर्च (कॅरिंग कॉस्ट)........................................................................................................

४.४ २०१८ मधील केस क्र.३१५ च्या एमटीआर फेरविचार याचिकेवरील आदेशाचा परिणाम........................................................१३

४.५ आर्थिक वर्ष २०-२१ ते आर्थिक वर्ष २४-२५ साठी एआरआर........................................................................................................१३

**५ प्रार्थना........................................................................................................१५**

## तक्त्यांची यादी

**तक्ता १:** भांडवलीखर्च आणि भांडवलीकरण आर्थिक वर्ष १७–१८..........५
**तक्ता २:** भांडवलीखर्च आणि भांडवलीकरण आर्थिक वर्ष १८–१९..........५
**तक्ता ३:** आर्थिक वर्ष १७–१८ साठी आकडेवारी साजेशी करून घेणे..........६
**तक्ता ४:** आर्थिक वर्ष १८–१९ साठी आकडेवारी साजेशी करून घेणे..........७
**तक्ता ५:** भांडवलीकरण आर्थिक वर्ष १९–२०..........१०
**तक्ता ६:** आर्थिक वर्ष १९–२० साठी अस्थायी फरक/(शिल्लक निधी)..........११
**तक्ता ७:** आर्थिक वर्ष २०–२१ आणि आर्थिक वर्ष २४–२५ साठी भांडवलीकरण..........१२
**तक्ता ८:** आर्थिक वर्ष २०–२१ ते आर्थिक वर्ष २४–२५ साठी एआरआर..........१३

# १. परिचय

## १.१ बहु-वर्षीय दर (एमवायटी) अधिनियम

माननीय महाराष्ट्र वीज नियामक आयोग (येथून पुढे ''माननीय आयोग''/''माननीय एमईआरसी'' असे संबोधण्यात येईल) यांनी विद्युत कायदा, २००३ (येथुन पुढे ईए, ०३ असे संबोधण्यात येईल) मधील संबंधीत कलमान्वये देण्यात आलेल्या अधिकारांसदर्भात खालील अधिनियम जारी केले आहेत:

- महाराष्ट्र वीज नियामक आयोग (बहु-वर्षीय दर) अधिनियम, २०१५ (येथून पुढे एमवायटी अधिनियम, २०१५ असे संबोधण्यात येईल) ८ डिसेंबर २०१५ रोजी आणि महाराष्ट्र वीज नियामक आयोग (बहु-वर्षीय दर) (पहिली सुधारणा) अधिनियम, २०१७.
- महाराष्ट्र वीज नियामक आयोग (बहु-वर्षीय दर) अधिनियम, २०१९ (येथून पुढे एमवायटी अधिनियम, २०१९ असे संबोधण्यात येईल) १ ऑगस्ट २०१९ रोजी

एमवायटी अधिनियम, २०१५ हे आर्थिक वर्ष १६-१७ ते आर्थिक वर्ष १९-२० ह्या नियंत्रण कालावधीसाठी लागू आहेत, तर एमवायटी अधिनियम, २०१९ हे आर्थिक वर्ष २०-२१ ते आर्थिक वर्ष २४-२५ ह्या नियंत्रण कालावधीसाठी लागू आहेत.

## १.२ बहु-वर्षीय दर (एमवायटी) याचिका सादर करण्यासाठी पार्श्वभूमी

एमवायटी अधिनियम, २०१९ मधील अधिनियम ५.१ (ए) मध्ये बहु-वर्षीय दर याचिका सादर करण्याची तरतूद केली आहे ज्यात यांचा समावेश आहे:

- एमवायटी अधिनियम, २०१५ अंतर्गत नियंत्रित आर्थिक वर्ष १७-१८ आणि आर्थिक वर्ष १८-१९ साठी आकडेवारी साजेशी करून घेणे (ट्रुईंग अप).
- एमवायटी अधिनियम, २०१५ अंतर्गत नियंत्रित आर्थिक वर्ष १९-२० साठी तात्पुरती आकडेवारी साजेशी करून घेणे (ट्रुईंग अप).
- एमवायटी अधिनियम, २०१९ अंतर्गत नियंत्रित आर्थिक वर्ष २०-२१ ते आर्थिक वर्ष २४-२५ ह्या नियंत्रण कालावधीतील प्रत्येक वर्षाची एकंदर आवश्यक महसूल (एआरआर)

माननीय आयोगाने २०१७ मधील प्रकरण क्र.२०१ मध्ये दिनांक १२-०९-२०१८ ह्या तारखेचा (येथून पुढे एमटीआर आदेश असे संबोधण्यात येईल) बहु-वर्षीय दर (एमवायटी) मध्य कलावधीचा आढावा (एमटीआर) जारी केला, ज्यात आर्थिक वर्ष१७-१८ साठी तात्पुरती साजेशी केलेली आकडेवारी (ट्रुईंग अप) आणि आर्थिक वर्ष १८-१९ साठी व आर्थिक वर्ष १९-२० साठी तात्पुरती साजेशी केलेली आकडेवारी (ट्रुईंग अप) मंजूर केली. काही मुद्दांमुळे त्रस्त होऊन एईएमएल-टी यांनी २०१८ मध्ये प्रकरण क्रमांक ३१५ अंतर्गत माननीय आयोगासमोर पुनरावलोकन याचिका दाखल केली. माननीय आयोगाने १२-१२-२०१८ रोजी आदेश जारी केला.

एमवायटी अधिनियम, २०१५, एमवायटी अधिनियम, २०१९, एमटीआर आदेश आणि पुनरावलोकन आदेशानुसार विद्यमान एमवायटी याचिका दाखल करण्यात येत आहे.

### १.३ परवाना – अदाणी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेड

माननीय आयोगाने त्यांच्या दिनांक २९ सप्टेंबर २०१८ च्या पत्राद्वारे अदाणी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेड (एईएमएल) यांना पारेषण परवाना दिला आहे.

अशा प्रकारे, पारेषण परवाना २०११ चा क्र.१ दिनांक ११ ऑगस्ट २०११ मध्ये सुधारणा करून पारेषण परवाना दिनांक १४ मार्च २०१६ तयार करण्यात आला आणि सुधारित पारेषण परवाना दिनांक १८ ऑगस्ट २०१७ हा अदाणी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेड यांच्या नावे आहे.

आजच्या तारखेपर्यंत, पारेषण परवाना, अधिकार आणि त्या अंतर्गत जबाबदाऱ्या आणि पारेषणची मालमत्ता ही एईएमआय यांच्या नावे आहे. सध्याची याचिका ही एईएमएलच्या पारेषण व्यवसायाशी संबंधित असल्यामुळे, ही याचिका याचिकाकर्ता या न्यायाने एईएमएल–टी (एईएमएल यांचा पारेषण व्यवसाय) यांनी दाखल केली आहे.

## २. आर्थिक वर्ष १७–१८ आणि आर्थिक वर्ष १८–१९ साठी आकडेवारी साजेशी (ट्रूईंग अप) करणे

एईएमएल–टी द्वारा आर्थिक वर्ष १७–१८ आणि आर्थिक वर्ष १८–१९ साठी भांडवली खर्च, महसूली खर्च आणि महसूली मिळकत याची साजेशी केलेली आकडेवारी सादर करण्यात येत आहे.

### २.१ भांडवली खर्च आणि भांडवलीकरण

भांडवली खर्च आणि भांडवलीकरण खालील प्रमाणे आहे:

**तक्ता १:** भांडवली खर्च आणि भांडवलीकरण आर्थिक वर्ष १७–१८

| तपशील (रू.कोटी) | भांडवलीकरण | भांडवली खर्च | भांडवलीकरण (आयडीसीसह) |
|---|---|---|---|
| | एमटीआर आदेश | प्रत्यक्ष | |
| डीपीआर | ७३.४५ | ८१.२२ | ७३.४५ |
| डीपीआर व्यतिरिक्त | १०.८४ | ४.८७ | १०.८४ |
| एकुण | ८४.२९ | ८६.०९ | ८४.२९ |

**तक्ता २:** भांडवली खर्च आणि भांडवलीकरण आर्थिक वर्ष १८–१९

| तपशील (रू.कोटी) | भांडवलीकरण | भांडवली खर्च | भांडवलीकरण (आयडीसीसह) |
|---|---|---|---|
| | एमटीआर आदेश | प्रत्यक्ष | |
| डीपीआर | १६.१७ | ४५.२१ | २६.२५ |
| डीपीआर व्यतिरिक्त | ३.०० | ४.५७ | ४.४४ |
| एकुण | १९.१७ | ४९.७८ | ३०.६९ |

### २.२ आर्थिक वर्ष १७–१८ आणि आर्थिक वर्ष १८–१९ साठी एआरआर निश्चित करण्यासाठी निकष

ए. घसारा: एमवायटी अधिनियम, २०१५ नुसार हिशोब करण्यात आला आहे.

बी. कर्जाऊ भांडवलावरील व्याज: वर्षभरातील प्रत्यक्ष कर्जाच्या स्वरूपानुसार व्याजाचा भारीत सरासरी दर निश्चित करण्यात आला आहे आणि एमवायटी अधिनियम, २०१५ नुसार व्याजाचा हिशोब करण्यात आला आहे.

सी. इक्विटीवरील परतावा: एमवायटी अधिनियम, २०१५ मधील तरतुदींनुसार हिशोब करण्यात आला आहे.

डी. प्रचालन व देखभाल (ओॲण्डएम) खर्च: एमवायटी अधिनियम, २०१५ मधील तरतुदींनुसार मूळ खर्चाची प्रत्यक्ष खर्चाबरोबर तुलना केली जाते आणि निव्वळ पात्रता निश्चित केली जाते.

ई. खेळत्या भांडवलावरील खर्च (आयओडब्ल्यूसी): प्रत्यक्ष व्याजाची (आर्थिक वर्ष १७–१८ निरंक आणि आर्थिक वर्ष १८–१९ मधील प्रत्यक्ष व्याजावर झालेला खर्च) याची मूळ व्याजाबरोबर तुलना केली जाते (एमवायटी अधिनियम, २०१५ मधील तरतुदींनुसार मूळ खेळते भांडवल आणि व्याजाचा दर विचारात घेऊन हिशोब केला जातो) आणि त्यानुसार निव्वळ पात्रता निश्चित केली जाते.

एफ. आकस्मिकता राखीव निधीसाठी योगदान: एमवायटी अधिनियम, २०१५ मधील तरतुदींनुसार हिशोब केला जातो.

जी. आयकर: पारेषण व्यवसायासाठी स्वतंत्र नियामक करपूर्व नफा (पीबीटी) निश्चित करण्याच्या संमत पद्धतीनुसार आयकराचा हिशोब केला जातो.

एच. दर –व्यतिरिक्त मिळकत (एनटीआय): प्रत्यक्षानुसार. परंतु, याचिकेत स्पष्ट केल्यानुसार काही घटकांचा विचार करण्यात आलेला नाही.

आय. इतर व्यवसायांद्वारे मिळकत: एमवायटी अधिनियम, २०१५ मधील तरतुदींनुसार हिशोब केला जातो.

जे. इनएसटीएस द्वारा महसूल: सूट वजा केल्यानंतर प्रत्यक्षानुसार.

के. उपलब्धता प्रोत्साहन (अ‍ॅव्हॅलिबिलिटी इन्सेन्टिव): एमवायटी अधिनियम, २०१५ मधील तरतुदींनुसार हिशोब केला जातो.

## २.३ आर्थिक वर्ष १८–१९ मध्ये व्यतिरिक्त परिणाम

माननीय आयोगाने त्यांच्या पत्र दिनांक २९ सप्टेंबर २०१८ च्या पत्राद्वारे एईएमएल यांच्या नावे पारेषण परवाना नेमून दिला आहे. त्यानुसार आर्थिक वर्ष १८–१९ मध्ये, एईएमआय द्वारा कमी खर्चाच्या कर्जाद्वारे थकित कर्जांना नव्याने वित्त पुरवठा केला. यासाठी एईएमएलने पुनर्वित्त शुल्काचा खर्च केला आहे. त्याचप्रमाणे, भांडवली खर्चासाठी एईएमएलने नव्याने कर्जे घेतली आणि एईएमएल खेळत्या भांडवलास मंजुरी मिळविली आहे, आणि ह्या प्रक्रियेत वित्त शुल्काचा खर्च केला. अशा प्रकारे वित्त शुल्क आणि पुनर्वित्त शुल्क यांचा स्वतंत्रपणे दावा करण्यात आला आहे.

त्याचप्रमाणे, एमवायटी अधिनियम, २०१५ मधील तरतुदींनुसार, एईएमएलने पुनर्वित्त पुरवठा करणामुळे झालेल्या व्याजाच्या खर्चातील निव्वळ बचतीशी संबंधित फायदा निश्चित केला आणि ह्या निव्वळ बचतीत २:१ ह्या प्रमाणात हिस्याचा प्रस्ताव मांडला आणि तो एआरआरमध्ये समाविष्ट करण्यात येत आहे.

## २.४ आर्थिक वर्ष १७–१८ आणि आर्थिक वर्ष १८–१९ साठी महसूलातील फरक/शिल्लक निधी

इनएसटीएस द्वारा मिळालेला महसूल आणि एकुण आवश्यक महसूल (दर –व्यतिरिक्त मिळकत आणि इतर व्यवसायांद्वारे मिळकत) यांची तुलना करून आर्थिक वर्ष १७–१८ आणि आर्थिक वर्ष १८–१९ साठी महसूलातील फरक/शिल्लक निधी निश्चित करण्यात आला आहे.

**तक्ता ३:** आर्थिक वर्ष १७–१८ साठी आकडेवारी साजेशी करून घेणे

| अनु.क्र. | तपशिल (रू.कोटी) | एमटीआर आदेश | सुधारित नॉर्मेटिव | प्रत्यक्ष | निव्वळ पात्रता | फरक |
|---|---|---|---|---|---|---|
| | **खर्च** | | | | | |
| १. | प्रचालन व देखभाल खर्च | ५६.५३ | ५६.७८ | ५९.१२ | ५७.५६ | १.०३ |
| २. | घसारा | ६४.७८ | | ६४.७८ | ६४.७८ | |

| अनु.क्र. | तपशिल (रू.कोटी) | एमटीआर आदेश | सुधारित नॉर्मेटिव | प्रत्यक्ष | निव्वळ पात्रता | फरक |
|---|---|---|---|---|---|---|
| ३. | दीर्घ मुदतीच्या कर्जाऊ भांडवलावरील व्याज | ५६.९४ | | ५४.८९ | ५४.८९ | (२.०५) |
| ४. | खेळत्या भांडवलावरील खर्च | ५.९७ | ५.९७ | ०.०० | १.९९ | (३.९८) |
| ५. | आयकर | २२.८५ | | २७.४८ | २७.४८ | ४.६३ |
| ६. | आकस्मिकता राखीव निधीसाठी योगदान | ३.७६ | | ३.७६ | ३.७६ | |
| ७. | **एकुण महसूली खर्च** | **२१०.८३** | | | **२१०.४७** | **(०.३६)** |
| ८. | इक्विटीवरील परतावा | ७८.३१ | | ७८.३१ | ७८.३१ | |
| ९. | **एकुण महसूली आवश्यकता** | **२८९.१४** | | | **२८८.७८** | **(०.३६)** |
| १०. | वजा: दर –व्यतिरिक्त मिळकत | ४.३७ | | ४.५९ | ४.५९ | (०.२२) |
| ११. | वजा: इतर व्यवसायांद्वारे मिळकत | ०.०९ | | ०.०९ | ०.०९ | – – |
| १२. | **पारेषण दर मधील एआरआर** | **२८४.६९** | | | **२८४.१०** | **(०.५९)** |
| १३. | इनएसटीएसद्वारा महसूल | ३१०.१५ | | ३०८.७९ | ३०८.७९ | (१.३६) |
| १४. | उपलब्धता प्रोत्साहन (इन्सेन्टिव) | | | २.१५ | २.१५ | २.१५ |
| १५. | **महसूलातील फरक/(शिल्लक निधी) = (१२–१३+१४)** | **(२५.४६)** | | | **(२२.५४)** | **२.९२** |

वरील अधिनियमानुसार, आर्थिक वर्ष १७–१८ मधील शिल्लक निधी आणि त्याचबरोबर सहामहिन्यांचा वहन खर्च (कॅरिंग कॉस्ट) आर्थिक वर्ष २०–२१ च्या एआरआर मध्ये विचारात घेण्यात आले आहेत आणि आर्थिक वर्ष २०–२१ ते आर्थिक वर्ष २४–२५ मधील एआरआरशी संबंधित कलमात त्याचा तपशील देण्यात आला आहे.

**तक्ता ४:** आर्थिक वर्ष १८–१९ साठी आकडेवारी साजेशी करून घेणे (ट्रुईंग अप)

| अनु.क्र. | तपशिल (रू.कोटी) | एमटीआर आदेश | नॉर्मेटिव | प्रत्यक्ष | निव्वळ पात्रता | | | फरक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | एईएमएल–पूर्व | एईएमएल–पश्चात | एकुण | |
| | **खर्च** | | | | | | | |
| १. | प्रचालन व देखभाल खर्च | ५९.९९ | ६०.५० | ६०.५१ | २२.७४ | ३७.७६ | ६०.५० | ०.५१ |
| २. | घसारा | ६९.१९ | | ६८.९५ | २८.३३ | ४०.६१ | ६८.९५ | (०.२४) |

| अनु.क्र. | तपशिल (रू.कोटी) | एमटीआर आदेश | नॉर्मेटिव | प्रत्यक्ष | निव्वळ पात्रता | | | फरक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | एईएमएल-पूर्व | एईएमएल-पश्चात | एकुण | |
| ३. | दीर्घ मुदतीच्या कर्जाऊ भांडवलावरील व्याज | ४९.१५ | | ४६.३२ | २१.७८ | २४.५३ | ४६.३२ | (२.८३) |
| ४. | वित्तपुरवठा शुल्क | - | | २.१८ | - | २.१८ | २.१८ | २.१८ |
| ५. | पुनर्वित्तपुरवठा शुल्क | - | | ३२.७८ | - | ३२.७८ | ३२.७८ | ३२.७८ |
| ६. | पुनर्वित्तपुरवठा एनपीव्ही | - | | ४.६७ | - | ४.६७ | ४.६७ | ४.६७ |
| ७. | खेळत्या भांडवलावरील व्याज | ५.२६ | ५.७३ | ३.२५ | ०.७८ | ३.२९ | ४.०८ | (१.१९) |
| ८. | आयकर | २२.८५ | | २२.४४ | ९.१६ | १३.२८ | २२.४४ | (०.४१) |
| ९. | आकस्मिकता राखीव निधीसाठी योगदान | ३.९७ | | ३.९७ | - | ३.९७ | ३.९७ | - |
| १०. | **एकुण महसूली खर्च** | **२१०.४१** | | | **८२.८०** | **१६३.०८** | **२४५.८८** | **३५.४६** |
| ११. | इक्विटीवरील परतावा | ८०.७१ | | ८०.९० | ३३.०२ | ४७.८८ | ८०.९० | ०.१९ |
| १२. | **एकुण आवश्यक महसूल (एआरआर)** | **२९१.१२** | | | **११५.८२** | **२१०.९६** | **३२६.७८** | **३५.६६** |
| १३. | वजा: दर-व्यतिरिक्त मिळकत | ३.८२ | | ५.७२ | २.३२ | ३.४० | ५.७२ | १.९० |
| १४. | वजा: इतर व्यवसायांद्वारे मिळकत | ०.०९ | | ०.११ | ०.०५ | ०.०७ | ०.११ | ०.०२ |
| १५. | **निव्वळ एआरआर** | **२८७.२१** | | | **११३.४५** | **२०७.४९** | **३२०.९४** | **३३.७३** |

| अनु.क्र. | तपशिल (रू.कोटी) | एमटीआर आदेश | नॉर्मेटिव | प्रत्यक्ष | निव्वळ पात्रता | | | फरक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | एईएमएल–पूर्व | एईएमएल–पश्चात | एकुण | |
| | | | | | | | | |
| १६. | प्रोत्साहन (इन्सेन्टिव) | – | | २.४३ | ०.८६ | १.५७ | २.४३ | २.४३ |
| १७. | आर्थिक वर्ष १८ पर्यंत फरक | (१३.५२) | | | – | (१३.५२) | (१३.५२) | – |
| १८. | वहन खर्च (कॅरिंग कॉस्ट) | ४.५७ | | | – | ४.५७ | ४.५७ | – |
| १९. | पारेषणवरील एआरआर | २७८.२६ | | | ११४.३१ | २००.११ | ३१४.४२ | ३६.१६ |
| २०. | इनएसटीएसद्वारे महसूल | २७८.२६ | | | १३०.४७ | १६४.७२ | २९५.१९ | १६.९३ |
| २१. | **महसूलातील फरक/(शिल्लक निधी)=१९-२०)** | – | | | **(१६.१६)** | **३५.३९** | **१९.२३** | **१९.२३** |

एईएमएल–टी द्वारा आर्थिक वर्ष १७–१८ आणि आर्थिक वर्ष १८–१९ साठी वर नमूद करण्यात आलेला महसूलातील फरक/शिल्लक निधी मंजूर करण्याची माननीय आयोग यांना विनंती करण्यात येत आहे.

एमवायटी अधिनियम, २०१५ नुसार, आर्थिक वर्ष १७–१८ आणि आर्थिक वर्ष १८–१९ मधील फरक/शिल्लक निधी आणि त्याचबरोबर सहा महिन्यांचा वहन खर्च (कॅरिंग कॉस्ट) आर्थिक वर्ष २०–२१ मधील एआरआर मध्ये विचारात घेण्यात आले आहेत.

## ३. आर्थिक वर्ष १९-२० साठी अस्थायी आकडेवारी साजेशी करून घेणे

एईएमएल-टी द्वारा आर्थिक वर्ष १९-२० साठी भांडवली खर्च, महसूली खर्च आणि महसूली मिळकत या संदर्भातील अस्थायी प्रत्यक्ष आकडेवारी सादर करण्यात येत आहे.

### ३.१ भांडवली गुंतवणूक योजना आणि भांडवलीकरण

एईएमएल-टी द्वारा पहिल्या सहा महिन्यातील अस्थायी प्रत्यक्ष आकडेवारीसह संपूर्ण आर्थिक वर्ष 19-20 साठी प्रस्तावित योजना विचारात घेऊन आर्थिक वर्ष 19-20 साठी भांडवली खर्च/भांडवलीकरणाची आकडेवारी सादर करण्यात येत आहे. सादर करण्यात येत आहे की, आरे-बोरिवली कनेक्टिविटी आणि त्याचप्रमाणे वर्सोवा ईएचव्ही स्टेशन येथील नवीन बेज हे आर्थिक वर्ष 19-20 च्या अखेरीस कार्यान्वित होतील अशी अपेक्षा असून त्यामुळे दुसऱ्या सहामाहीच्या भांडवलीकरणात हातभार लागेल.

भांडवली खर्च आणि भांडवलीकरण खालील प्रमाणे आहे:

**तक्ता ५:** भांडवलीकरण आर्थिक वर्ष १९-२०

| आयडीसी सह भांडवलीकरण (रू.कोटी) | एमटीआर ऑर्डर | एच१ (अस्थायी प्रत्यक्ष आकडेवारी) | एच२ (अंदाजे) | एकुण |
|---|---|---|---|---|
| डीपीआर | ३५३.१७ | ०.५१ | ३१५.८३ | ३१६.३३ |
| डीपीआर व्यतिरिक्त | ३०.०० | ४.७० | २८.३० | ३३.०० |
| एकुण | ३८३.१७ | ५.२१ | ३४४.१२ | ३४९.३३ |

### ३.२ आर्थिक वर्ष १९-२० साठी एआरआर निश्चित करण्याचे निकष

ए. घसारा: एमवायटी अधिनियम, २०१५ नुसार हिशोब करण्यात आला आहे.

बी. कर्जाऊ भांडवलावरील व्याज: वर्षाच्या सुरूवातीला प्रत्यक्ष कर्जाच्या स्वरूपानुसार व्याजाचा भारीत सरासरी व्याजाचा दर विचारात घेण्यात आला आहे आणि एमवायटी अधिनियम, २०१५ नुसार व्याजाचा हिशोब करण्यात आला आहे.

सी. इक्विटीवरील परतावा: एमवायटी अधिनियम, २०१५ मधील तरतुदींनुसार हिशोब करण्यात आला आहे.

डी. प्रचालन व देखभाल (ओॲण्डएम) खर्च: आर्थिक वर्ष १९-२० हे अस्थायी स्वरूपाचे साजेसे करून घेण्याचे वर्ष असल्यामुळे, मूळ (नॉर्मेटिव) खर्च हा एमवायटी अधिनियम, २०१५ नुसार निश्चित करण्यात आला आहे. त्याशिवाय, भविष्य निर्वाह निधीसंबंधी माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे होणारा परिणाम आणि किमान वेतनासंबंधी महाराष्ट्र सरकारची अधिसूचना यांचा मूळ (नॉर्मेटिव) खर्चाहून अधिक दावा करण्याचा प्रस्ताव आहे.

ई. खेळत्या भांडवलावरील खर्च (आयओडब्ल्यूसी): आर्थिक वर्ष १९-२० हे अस्थायी स्वरूपाचे साजेसे करून घेण्याचे वर्ष असल्यामुळे, एमवायटी अधिनियम, २०१५ मधील तरतुदींनुसार नॉर्मेटिव पद्धतीने आयओडब्ल्यूसीचा दावा करण्यात आला आहे.

एफ. आकस्मिकता राखीव निधीसाठी योगदान: एमवायटी अधिनियम, २०१५ मधील तरतुदींनुसार हिशोब केला जातो.

जी. आयकर: एमवायटी अधिनियम, २०१५ मधील तरतुदींनुसार, आर्थिक वर्ष १८-१९ साठी प्रत्यक्ष देय आयकराच्या प्रमाणात आर्थिक वर्ष १९-२० साठी अस्थायी स्वरूपात आयकर विचारात घेण्यात आला आहे.

एच. दर व्यतिरिक्त मिळकत (एनटीआय): आर्थिक वर्ष १९-२० मधील पहिल्या सहामाहीसाठी मागील कल आणि अस्थायी प्रत्यक्ष आकडेवारी विचारात घेऊन अंदाज करण्यात आला आहे.

आय. इनएसटीएस द्वारा महसूल: आर्थिक वर्ष १९-२० हे अस्थायी आकडेवारी साजेशी करण्याचे (ट्रुईंग अप) वर्ष असल्यामुळे, विचारात घेण्यात आलेला महसूल हा प्रत्यक्ष आकारण्यात आलेला महसूल आहे.

### ३.३ आर्थिक वर्ष १९-२० साठी अस्थायी महसुली फरक/शिल्लक निधी

आर्थिक वर्ष १९-२० साठी अस्थायी प्रत्यक्ष आकडेवारीचा गोषवारा खाली देण्यात आला आहे:

**तक्ता ६:** आर्थिक वर्ष १९-२० साठी अस्थायी फरक/(शिल्लक निधी)

| अनु.क्र. | तपशील (रू.कोटी) | एमटीआर आदेश | अस्थायी प्रत्यक्ष आकडेवारी | फरक |
|---|---|---|---|---|
| | **खर्च** | | | |
| १. | प्रचालन व देखभाल खर्च | ६४.६९ | ६४.७६ | ०.०७ |
| २. | घसारा | ७९.५४ | ७४.५७ | (४.९७) |
| ३. | दीर्घ मुदतीच्या कर्जाऊ भांडवलावरील व्याज | ५५.७८ | ५०.५० | (५.२८) |
| ४. | खेळत्या भांडवलावरील व्याज | ५.७९ | ५.८३ | ०.०४ |
| ५. | आयकर | २२.८५ | २२.४४ | (०.४१) |
| ६. | आकस्मिकता राखीव निधीसाठी योगदान | ४.०२ | ४.०४ | ०.०२ |
| ७. | **एकुण महसुली खर्च** | **२३२.६७** | **२२२.१४** | **(१०.५३)** |
| ८. | इक्विटीवरील परतावा | ९०.०६ | ८९.६६ | (०.४०) |
| ९. | **एकुण आवश्यक महसुल** | **३२२.७३** | **३११.७९** | **(१०.९४)** |
| १०. | वजा: दर-व्यतिरिक्त मिळकत | ४.२१ | ३.७७ | (०.४४) |
| ११. | वजा: इतर व्यवसायांद्वारे मिळकत | ०.०९ | - | (०.०९) |
| १२. | **पारेषण द्वारे एआरआर** | **३१८.४४** | **३०८.०३** | **(१०.४१)** |
| १३. | इनएसटीएसद्वारा महसूल | ३१८.४४ | ३१८.४४ | - |
| १४. | महसुलातील फरक/(शिल्लक निधी)=(१२-१३) | - | (१०.४१) | (१०.४१) |

एईएमएल–टी द्वारा माननीय आयोगाला आर्थिक वर्ष १९–२० साठी वर नमूद करण्यात आलेला अस्थायी महसूल शिल्लक निधी मंजुर करण्याची विनंती करण्यात येत आहे. सदर अधिशेष आर्थिक वर्ष २०–२१ च्या एआरआरमध्ये विचारात घेण्यात आला आहे.

**४. आर्थिक वर्ष २०–२१ आणि आर्थिक वर्ष २४–२५ साठी एआरआर**

एईएमएल–टी द्वारा एमवायटी अधिनियम, २०१९ नुसार नियंत्रण कालावधी अर्थात आर्थिक वर्ष २०–२१ ते आर्थिक वर्ष २४–२५ ह्या पुढील ५ वर्षांसाठी एआरआरच्या प्रोजेक्शन्स (अंदाज) सादर करण्यात येत आहेत.

**4.1 भांडवली गुंतवणूक योजना आणि भांडवलीकरण**

नियंत्रण कालावधीत विचारात घेण्यात आलेल्या योजनांमध्ये माननीय आयोगाने तात्विक मंजुरी दिलेल्या योजना आणि स्टेट ट्रान्समिशन युटिलटी (एसटीयू) समोर चर्चेच्या विविध टप्यांमध्ये असलेल्या व एसटीयूने त्यांची मंजुरी दिल्यानंतर माननीय आयोगासमोर सादर करण्यात येणार असलेल्या परंतु माननीय आयोगासमोर सादर न केलेल्या योजना, यांचा त्यात समावेश आहे.

भांडवली गुंतवणूक योजना आणि भांडवलीकरण (यात आयडीसीचा समावेश आहे) खालील प्रमाणे आहे:

**तक्ता ७:** आर्थिक वर्ष २०–२१ आणि आर्थिक वर्ष २४–२५ साठी भांडवलीकरण

| तपशील (रू.कोटी) | आर्थिक वर्ष २०–२१ | आर्थिक वर्ष २१–२२ | आर्थिक वर्ष २२–२३ | आर्थिक वर्ष २३–२४ | आर्थिक वर्ष २४–२५ |
|---|---|---|---|---|---|
| डीपीआर | ६६५.८० | १,१५५.३० | ८१९.८२ | ५,८७२.१३ | ९७९.४३ |
| डीपीआर–व्यतिरिक्त | ३२.७८ | २०.०० | २०.०० | २०.०० | २०.०० |
| एकुण | ६९८.५७ | १,१७५.३० | ८३९.८२ | ५,८९२.१३ | ९९९.४३ |

## ४.२ नियंत्रण कालावधीसाठी एआरआर निश्चित करण्याचे निकष

ए. घसारा: एमवायटी अधिनियम, २०१५ नुसार हिशोब करण्यात आला आहे.

बी. कर्जाऊ भांडवलावरील व्याज: नियंत्रण कालावधीतील प्रत्येक वर्षाच्या सुरूवातीला व्याजाचा भारीत सरासरी दर हा आर्थिक वर्ष १९–२० च्या सुरूवातीला असलेल्या दराइतकाच विचारात घेण्यात आला आहे. एमवायटी अधिनियम, २०१९ नुसार व्याजाचा हिशोब करण्यात आला आहे.

सी. इक्विटीवरील परतावा: एमवायटी अधिनियम, २०१९ मधील तरतुदींनुसार, १४% मूळ आरओई आणि प्रत्यक्ष कामगिरीनुसार अधिक आरओईशी संलग्न करण्याची परवानगी देण्यात आली आहे. प्रत्यक्ष कामगिरी ही उपलब्धता निकषाच्या संदर्भात आहे. उपलब्धता निकषांच्या संदर्भात एईएमएल–टीच्या ऐतिहासिक कामगिरीचा विचार करून उपलब्धता निकषांच्या संदर्भात, एईएमएल–टी यांनी ह्या याचिकेत आरओई १५.५% विचारात घेऊन आणि एमएटी दरानुसार ढोबळ धरून हिशोब केला आहे.

डी. प्रचालन व देखभाल (ओॲण्डएम) खर्च: एईएमएल–टी द्वारा विविध भांडवली कामांच्या प्रस्तावित पूर्ततेनुसार नियंत्रण कालावधीच्या प्रत्येक वर्षात अधिकतम सर्किट कि.मी. आणि बेज् अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. एमवायटी अधिनियम, २०१९ मधील नियम ६१.४ मधील तरतुदीनुसार, आणि एईएमएल–टी द्वारा प्रथमच प्रस्तावित केलेल्या व्होल्टेजसाठीच्या एमवायटी अधिनियम, २०१९ मधील नियम ६१.६ मधील तरतुदीनुसार, एईएमएल–टी च्या यंत्रणेत अगोदरच असलेल्या व्होल्टेजसाठी नियम लागू करण्यात आले आहेत.

त्याशिवाय पीएफच्या योगदानासंबंधी माननीय सर्वोच्च न्यायालयाचा निकाल, किमान वेतन आणि आरे–बोरिवली केबल कनेक्टिविटीसाठी ग्राऊंड रेन्टल शुल्क ह्यासंबंधी महाराष्ट्र सरकारची अधिसूचना यामुळे होणाऱ्या परिणामासाठी सामान्य खर्चाहून अधिक दावा करण्याचा प्रस्ताव आहे.

ई. खेळत्या भांडवलावरील खर्च (आयओडब्ल्यूसी): एमवायटी अधिनियम, २०१९ मधील तरतुदींनुसार सामान्य पद्धतीने आयओडब्ल्यूसीचा दावा करण्यात आला आहे.

एफ. आकस्मिकता राखीव निधीसाठी योगदान: एमवायटी अधिनियम, २०१९ मधील तरतुदींनुसार हिशोब केला जातो.

जी. दर व्यतिरिक्त मिळकत (एनटीआय): प्रस्तावित एनटीआयमध्ये जमिनीच्या वापरासाठी मिळालेली भाड्याची मिळकत आणि आकस्मिक राखीव निधीच्या गुंतवणुकीवरील व्याज यांचा समावेश आहे.

## ४.३ आर्थिक वर्ष १७–१८ आणि आर्थिक वर्ष १८–१९ ते आर्थिक वर्ष २०–२१ साठी महसूलातील फरक/शिल्लक निधी वरील वहन खर्च (कॅरिंग कॉस्ट)

एमवायटी अधिनियम, २०१५ आणि एमवायटी अधिनियम, २०१९ मधील तरतुदींनुसार आर्थिक वर्ष १७–१८ आणि आर्थिक वर्ष १८–१९ साठी महसूलातील फरक/(शिल्लक निधी) वरील वहन खर्चाचा (कॅरिंग कॉस्ट) हिशोब करण्यात आला आहे.

२०१५ ते आर्थिक वर्ष १९–२० साठी एमवायटी अधिनियम, २०१५ अधिनियम ३२ मधील नुसार आणि आर्थिक वर्ष २०–२१ साठी एमवायटी अधिनियम, २०१९ मधील अधिनियम ३३ नुसार वहन खर्चाचा (कॅरिंग कॉस्ट) हिशोब करण्यात आला आहे.

## ४.४ २०१८ मधील केस क्र.३१५ च्या एमटीआर फेरविचार याचिकेवरील आदेशाचा परिणाम

एईएमएल–टी यांनी २०१७ मधील केस क्र.२०१ वरील एमटीआर याचिकेविरूद्ध २०१८ मध्ये केस क्र.३१५ अन्वये फेरविचार याचिका दाखल केली होती. माननीय आयोगाने आपल्या दिनांक १२–१२–२०१८च्या आदेशाद्वारे फेरविचार याचिका फेटाळून लावली. त्यानुसार, फेरविचार रक्कम रू.१.७५ कोटी च्या एकुण परिणामात रू.०.५० कोटीचा वहन खर्च (कॅरिंग कॉस्ट) समाविष्ट आहे.

## ४.५ आर्थिक वर्ष २०–२१ ते आर्थिक वर्ष २४–२५ साठी एआरआर

आर्थिक वर्ष २०–२१ ते आर्थिक वर्ष २४–२५ ह्या नियंत्रण कालावधीतील प्रत्येक वर्षाचा एकुण अंदाजे एआरआर खालील प्रमाणे आहे:

**तक्ता ८:** आर्थिक वर्ष २०–२१ ते आर्थिक वर्ष २४–२५ साठी एआरआर

| अनु.क्र. | तपशील (रू.कोटी) | आर्थिक वर्ष २०–२१ | आर्थिक वर्ष २१–२२ | आर्थिक वर्ष २२–२३ | आर्थिक वर्ष २३–२४ | आर्थिक वर्ष २४–२५ |
|---|---|---|---|---|---|---|
| | **खर्च** | | | | | |
| १. | प्रचालन व देखभाल खर्च | ६२.४० | ७३.७६ | ९१.१५ | ११३.०८ | १३३.५३ |
| २. | घसारा | १०५.२८ | १४८.९२ | १९३.४७ | ३५७.८३ | ५२२.४४ |
| ३. | दीर्घ मुदतीच्या कर्जाच्या भांडवलावरील व्याज | ७५.५५ | १२३.४१ | १७१.७४ | ३६०.०३ | ५३८.४९ |
| ४. | खेळत्या भांडवलावरील व्याज | ७.०७ | ९.५९ | १२.९० | २०.६९ | ३३.४० |

| अनु.क्र. | तपशील (रू.कोटी) | आर्थिक वर्ष २०-२१ | आर्थिक वर्ष २१-२२ | आर्थिक वर्ष २२-२३ | आर्थिक वर्ष २३-२४ | आर्थिक वर्ष २४-२५ |
|---|---|---|---|---|---|---|
| ५. | आकस्मिकता राखीव निधीसाठी योगदान | ४.९१ | ६.६६ | ९.६० | ११.७० | २६.४३ |
| ६. | **एकुण महसूली खर्च** | **२५५.२१** | **३६२.३४** | **४७८.८६** | **८६३.३३** | **१,२५४.२८** |
| ७. | इक्विटीवरील परतावा | १३८.१५ | १९०.९४ | २४७.७१ | ४३७.३७ | ६३१.५२ |
| ८. | **एकुण आवश्यक महसूल** | **३९३.३६** | **५५३.२८** | **७२६.५७** | **१,३००.६९** | **१,८८५.७९** |
| ९. | वजा: दर –व्यतिरिक्त मिळकत | २.६३ | २.६३ | २.६३ | २.६३ | २.६३ |
| १०. | **पारेषण द्वारे एआरआर** | **३९०.७४** | **५५०.६५** | **७२३.९४** | **१,२९८.०६** | **१,८८३.१७** |
| ११. | आर्थिक वर्ष १७–१८ महसूलातील फरक/(शिल्लक निधी) – वाढता | २.९२ | | | | |
| १२. | यावरील वहन खर्च (कॅरिंग कॉस्ट) | (२.३३) | | | | |
| १३. | आर्थिक वर्ष १८–१९ महसूलातील फरक/(शिल्लक निधी) | १९.२३ | | | | |
| १४. | यावरील वहन खर्च (कॅरिंग कॉस्ट) | ३.२२ | | | | |
| १५. | आर्थिक वर्ष १६–१७ वहन खर्चासह फेरविचार याचिकेचा परिणाम | (१.७५) | | | | |
| १६. | आर्थिक वर्ष १९–२० महसूलातील फरक/(शिल्लक निधी) | (१०.४१) | | | | |
| १७. | **महसूलातील फरक/(शिल्लक निधी)** | **४०१.६३** | **५५०.६५** | **७२३.९४** | **१,२९८.०६** | **१,८८३.१७** |

एईएमएल–टी द्वारा माननीय आयोगाला नियंत्रण कालावधीतील प्रत्येक वर्षात पारेषण दर मधून वरील एआरआर वसूल करण्यास मंजुरी देण्याची विनंती करण्यात येत आहे.

**५. प्रार्थना**

एईएमएल–टी द्वारा माननीय आयोगाला खालील प्रमाणे विनंती करण्यात येत आहे:

१. येथे सादर केल्यानुसार याचिका दाखल करून घ्यावी;

२. ह्या याचिकेत दर्शविल्याप्रमाणे वहन खर्चासोबत (कॅरिंग कॉस्ट) आर्थिक वर्ष २०१७–१८ आणि आर्थिक वर्ष २०१८–१९ साठी आकडेवारी साजेशी केल्यामुळे (ट्रुईंग अप) निर्माण झालेला महसुली फरक/शिल्लक निधी मंजूर करावा.

३. ह्या याचिकेत दर्शविल्याप्रमाणे आर्थिक वर्ष २०१९–२० साठी तात्पुरते एआरआर आणि महसुलील फरक/शिल्लक निधी मंजूर करावे.

४. ह्या याचिकेत दर्शविल्याप्रमाणे नियंत्रण कालावधी आर्थिक वर्ष २०२०–२१ ते आर्थिक वर्ष २०२४–२५ मधील प्रत्येक वर्षासाठी एआरआरला मंजुरी द्यावी.

५. भविष्यातील तारखेला याचिकेत वाढ/फेरफार/फेरबदल बदल करण्याची परवानगी द्यावी.

६. माननीय आयोगाला मंजूर करणे योग्य वाटतील असे इतर कोणतेही सूट आदेश किंवा निर्देश देण्याची परवानगी द्यावी.

७. सदर याचिकेत अनवधनाने काही चुका/निसंगती/वगळणे/मतभेद यापैकी काही आढळल्यास त्याबद्दल माफ करावे.

किशोर पाटील

मुंबई — अधिकृत प्रतिनिधी

५ डिसेंबर २०१९ — अदाणी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेड